| Roll No. | | | | | | | | | | | | Serial No. of Q. C. A. B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 56 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 24

Total No. of Questions : 56 ] [ Total No. of Printed Pages : 24

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M** **ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ**

**Code No. : 85-M** **Subject : SOCIAL SCIENCE**

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )

ದಿನಾಂಕ : 24. 06. 2013 ] [ Date : 24. 06. 2013

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 9-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 9-30 A.M. to 12-45 P.M.

ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**FOR OFFICE USE ONLY**

| Q. No. | Marks | | Q. No. | Marks | | Q. No. | Marks | | Q. No. | Marks | | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | 14. | | | 27. | | | 40. | | | 53. | |
| 2. | | | 15. | | | 28. | | | 41. | | | 54. | |
| 3. | | | 16. | | | 29. | | | 42. | | | 55. | |
| 4. | | | 17. | | | 30. | | | 43. | | | 56. | |
| 5. | | | 18. | | | 31. | | | 44. | | | × | |
| 6. | | | 19. | | | 32. | | | 45. | | | × | |
| 7. | | | 20. | | | 33. | | | 46. | | | × | |
| 8. | | | 21. | | | 34. | | | 47. | | | × | |
| 9. | | | 22. | | | 35. | | | 48. | | | × | |
| 10. | | | 23. | | | 36. | | | 49. | | | × | |
| 11. | | | 24. | | | 37. | | | 50. | | | × | |
| 12. | | | 25. | | | 38. | | | 51. | | | × | |
| 13. | | | 26. | | | 39. | | | 52. | | | × | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ***Total Marks*** | |
| **Total Marks in words** | | **Grand Total** | |
| 1. ✓ | | | |
| 2. ✓ | | ✓ | ✓ |
| *Signature of Evaluators* | *Registration No.* | *Signature of the Deputy Chief* | *Signature of the Room Invigilator* |

999162 [ Turn over

**सामान्य सूचना :**

i) या प्रश्नोत्तर पत्रिकेत वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 56 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृति, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

I. खाली दिलेल्या बहुपर्यायी किंवा अपूर्ण वाक्यांशाला **चार** पर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्या पैकी योग्य उत्तर निवडून ते उत्तर संकेताक्षरासह दिलेल्या जागेतच लिहा : $15 \times 1 = 15$

1. 1761 मध्ये काऊंट-द-लिली हा ब्रिटिशांना येथे शरण आला —

(A) मद्रास
(B) पाँडेचरी
(C) मुंबई
(D) कलकत्ता.

उत्तर : ____________________

2. मुलींसाठी पहिली माध्यमिक शाळा यांनी सुरु केली —

(A) न्यायमूर्ती रानडे

(B) डॉ० आत्माराम पांडूरंग

(C) ज्योतिबा फुले

(D) धोंडो केशव कर्वे.

उत्तर : ____________________

3. या पैकी एक सर विश्वेश्वरय्यांचे कार्य नाही —

(A) भद्रावती पोलाद कारखाना

(B) हेब्बाळ येथील शेतकी महाविद्यालय

(C) बेंगलोर येथील सरकारी साबण कारखाना

(D) भद्रावती येथील सिमेंट आणि कागद कारखाना.

उत्तर : ____________________

4. म्हैसूर सरकारचे जबाबदार मुख्यमंत्री म्हणून कोणी शपथ घेतली ?

(A) के० टी० भाष्यम

(B) के० सी० रेड्डी

(C) टी० सिद्धलिंगय्या

(D) अर्काट रामस्वामी मुदलियार.

उत्तर : ____________________

5. पुढील पैकी कोणी अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व केले ?

(A) पं० नेहरू

(B) माओ-त्से-तुंग

(C) फ्रँकलिन रूझवेल्ट

(D) स्टॅलिन.

उत्तर : ____________________

6. रशियामध्ये झारची राजवट संपुष्टात आली. का ?

(A) झारचा कारभार अत्यंत क्रूर व दडपशाहीचा होता.

(B) जपानने रशियाला पराभूत केले.

(C) जमिनदारांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली.

(D) कम्युनिस्ट नेत्यांनी क्रांतीकारी समाजवादी संघटना स्थापन केल्या.

उत्तर : ____________________

7. घटनेतील या कलमानुसार शिक्षण हा मूलभूत हक्क मानला गेला आहे.

(A) 42 (B) 93

(C) 73 (D) 74.

उत्तर : ____________________

8. मर्यादित चाचणी बंदी करार ( Limited Test Ban Treaty ) या देशा दरम्यान करण्यात आला —

(A) अमेरिका, रशिया आणि इंग्लंड

(B) अमेरिका, रशिया आणि इटली

(C) अमेरिका, रशिया आणि जर्मनी

(D) अमेरिका, रशिया आणि जापान.

उत्तर : ______________________

9. सौराष्ट्रातील गीर हे या प्राण्यांचे वसती स्थान आहे —

(A) इबेक्स (B) वाघ

(C) पांडा (D) सिंह.

उत्तर : ______________________

10. जागतीक आरोग्य संघटनेचे ( W.H.O. ) महत्त्वाचे कार्य आहे —

(A) प्लेगचे उच्चाटन

(B) मलेरियाचे उच्चाटन

(C) कॉलराचे उच्चाटन

(D) देवी रोगाचे उच्चाटन.

उत्तर : ______________________

11. या खनिजात भारताची मक्तेदारी आहे —

(A) तांबे
(B) अभ्रक
(C) सोने
(D) बॉक्साईट.

उत्तर : ______________________

12. अमृतसर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ —

(A) राजसांसी विमानतळ
(B) सुभाषचंद्र बोस विमानतळ
(C) छत्रपती शिवाजी विमानतळ
(D) इंदिरा गांधी विमानतळ.

उत्तर : ______________________

13. कलकत्ता बंदर या नावानेही प्रसिद्ध आहे —

(A) कॉटन-पोलिस
(B) भारताचा जावा
(C) भारताचे चहाचे बंदर
(D) मँचेस्टर ऑफ इंडिया.

उत्तर : ______________________

14. पुढीलपैकी अयोग्य जोडी कोणती ?

(A) कुमरी — कर्नाटक
(B) झुम — असम
(C) पोडू — मद्रास
(D) पोणम — केरळ.

उत्तर : ______________________

15. राष्ट्रीय लघु उद्योग निगमची स्थापना हे पुरविण्यासाठी केली आहे —

(A) संघटनात्मक मदत (B) आर्थिक मदत

(C) तांत्रिक मदत (D) संशोधन आणि प्रशिक्षणाची मदत.

उत्तर : ______

II. 16. **अ** व **ब** यादीतील योग्य जोड्या जुळवून उत्तरे खाली दिलेल्या जागेत लिहा : 5 × 1 = 5

| अ | ब |
|---|---|
| (a) भारताचा पहिला ब्रिटिश गव्हर्नर जनरल | (i) एन० एस० हर्डिकर |
| (b) पहिला कायदेविषयक सल्लागार | (ii) टी० बी० कुन्हा |
| (c) हिंदुस्तान सेवादल | (iii) टी० बी० मेकॉले |
| (d) भारतीय राज्य घटना मसुदा समितीचे अध्यक्ष ( Chairman ) | (iv) पुरुषोत्तम काकोडकर |
| (e) गोवा मुक्ती आंदोलनाचे जनक | (v) वॉरन हेस्टिंग्स |
| | (vi) सी० राजगोपालाचारी |
| | (vii) डॉ० बी० आर० आंबेडकर |
| | (viii) डॉ० राजेंद्र प्रसाद. |

उत्तर : a) ______

b) ______

c) ______

d) ______

e) ______

III. रिकाम्या जागा योग्य उत्तरांनी भरा : 5 × 1 = 5

17. सार्वजनिक शिक्षण खात्याची स्थापना .......................................................................... यांच्या सल्ल्याने करण्यात आली.

18. म्हैसूर प्रातिनिधिक सभेची स्थापना .......................................................................... यांनी केली.

19. भारत सरकारने राष्ट्रीय शिक्षण योजना ( National Education Policy ) या वर्षी घोषित केली ते वर्ष ........................................................... .

20. एका देशाकडून माल घेऊन तो दुसऱ्या देशाला विकणे या प्रकारच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला .......................................................................... व्यापार असे म्हणतात.

21. पंपसागर धरण .......................................................................... या नदीवर आहे.

IV. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 9 × 1 = 9

22. डच लोकांनी भारतातील व्यापार का सोडला ?

23. रयतवारी पद्धत कोणी सुरु केली ?

24. कर्नाटकातील कोणत्या वृत्तपत्रानी मोठ्या प्रमाणात राष्ट्रीयत्वाचा सर्वत्र प्रसार केला ?

25. भारत आज कोणत्या समाज विघातक गोष्टींना तोंड देत आहे ?

26. संयुक्त राष्ट्र संघटनेचे ( UNO ) सचिव कोण आहेत ?

27. सार्कची दुसरी परिषद कोठे भरली होती ?

28. पक्क्या रस्त्यांना कायमस्वरूपी बारमाही रस्ते का म्हणतात ?

29. भारतात तंबाखूचे पीक सर्वप्रथम कोणी आणले ?

30. भारताच्या योजना आयोगाचे कायमस्वरूपी अध्यक्ष कोण असतात ?

V. पुढील प्रश्नांची प्रत्येकी **दोन** वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 2 = 32

31. ''चिक्कदेवराज वडेयर हा राजा कला आणि साहित्याचा भोक्ता होता.'' हे विधान स्पष्ट करा.

32. चौथ्या कृष्णराज वडेयरच्या राज्य कारभाराने म्हैसूरला एक आदर्श राज्य बनविले. स्पष्ट करा.

33. इंग्लंड मध्ये झालेल्या औद्योगिक क्रान्तीमुळे भारतीय उद्योग धंदे कसे नाश पावले ? कारणे द्या.

34. भारतीय इतिहासामध्ये 19 वे शतक पुनरुज्जीवनाचे युग मानले जाते. का ?

35. जम्मू आणि काश्मीरची समस्या काय आहे ? कोणतेही चार विशद करा.

36. पहिल्या जागतिक महायुद्धाची कारणे स्पष्ट करा.

37. भारत सरकारने बालकांच्या कल्याणासाठी कोणत्या संस्था स्थापन केल्या आहेत ?

38. संयुक्त राष्ट्र संघटनेची ( UNO ) कोणती शाखा सुरक्षा दल म्हणून प्रसिद्ध आहे ? या समितीची कार्ये कोणती ?

39. दुसऱ्या जागतिक महायुद्धात अमेरिकेने भूमिका बजावली.

40. वर्णभेद म्हणजे काय ? दक्षिण आफ्रिकेत त्याचा शेवट कसा झाला ?

41. उत्तरेकडील मैदानी प्रदेशाला 'भारताचे हृदय' का म्हणतात ?

42. भारतातील नैसर्गिक वनस्पतींचे कोणतेही चार प्रकार लिहा.

43. नदी खोऱ्यातील बहुउद्देशीय योजनांचे चार उद्देश लिहा.

44. कुटिर उद्योग आणि लघु उद्योगातील फरक स्पष्ट करा.

45. सौर शक्तीची उपयुक्तता कशी आहे ?

46. देशाच्या आर्थिक विकासामध्ये नियोजन मंडळ कोणती महत्वाची भूमिका निभावते ?

VI. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा** वाक्यात लिहा : 6 × 3 = 18

47. बक्सारच्या लढाईची कारणे आणि परिणाम लिहा.

48. कोणती शासकीय कारणे 1857 च्या उठावाला कारणीभूत झाली ?

49. दारिद्र्य निवारणासाठी भारत सरकारने कोणते उपाय योजले आहेत ?

50. भारताच्या हवामानाचे मोसम आणि भारतीय शेतीचे मोसम कसे वेगळे आहेत ते लिहा.

51. वाढत्या औद्योगिक विकासामुळे आपण कोणत्या समस्यांना तोंड देत आहोत ?

52. भारताच्या विदेशी व्यापाराची वैशिष्ट्ये लिहा.

VII. पुढिल प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **आठ** वाक्यात लिहा : $3 \times 4 = 12$

53. कायदे भंगाची चळवळ आणि छोडो भारत ( चले जाव ) चळवळीतील महात्मा गांधीची भूमिका स्पष्ट करा.

54. अमेरिकेच्या तुलनेत भारताचे रशिया बरोबर असलेले संबंध अधिक दृढ मैत्रीचे आहेत. हे विधान स्पष्ट करा.

55. नियंत्रित दर बाजार पेठांची रचना आणि कार्ये लिहा.

VIII. 56. भारताचा सुबक नकाशा काढून त्यात पुढील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

अ) कर्कवृत्त

ब) विशाखापट्टण

क) चंबळ नदी योजना.

**सूचना : केवल अंध विद्यार्थ्यांकरीता पर्यायी प्रश्न ( प्रश्न संख्या 56 च्या पर्यायी )**

जंगलांचे महत्त्व लिहा. 4